# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./३४७ /२०१९ दि.३०/०१/२०१९

## परिपत्रक

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये व शासकीय/शासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था यांनी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत..

संदर्भ :- मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१८/प्र.क्र.३२४ /मशि-५, दिनांक १८ डिसेंबर २०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक ११६१३/२०१४ व २५२७/२०१७ मध्ये निर्णय देताना न्यायालयीन प्रकरणे हाताळणीबाबत तसेच सर्वसाधारण कार्यालयीन कार्यपध्दतीबाबत कठोर निरीक्षणे मा. न्यायालयाने नोंदवुन याबाबत ठोस उपाययोजना तात्काळ करण्याचे निर्देश दिलेले आहेत. न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासदंर्भात शासनाने यापुर्वी संदर्भाधीन परिपत्रकान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचना पुन:श्च या परिपत्रकाद्वारे निदर्शनास आणण्यात येत असून, न्यायालयीन प्रकरणे उदभवु नयेत याकरीता संदर्भीय पत्रामधील नमुद बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे आणि यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमीतता झाल्यास संबंधीत अधिकाऱ्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केले असल्याने उक्तबाबीनुसार आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सदरहु परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे व उक्तप्रमाणे अवलंब करावा.

( योगेश्वर चरडे )
**अधिक्षक(प्र.)**

Saib/Circular/College circular/२८

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 68 दि. 23/01/19
जावक क्र. 240 दि. 23/01/19

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 587 दि. 23/1/19
जावक क्र. 029 दि. 24/1/19

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये व शासकीय/शासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था यांनी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत...

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 315 दि. 24.1.19
जावक क्र.................दि..............

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१८/प्र.क्र. ३२४/मशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १८ डिसेंबर, २०१८

वाचा:-

१. शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२००९/प्र.क्र.२२०/०९/मशि-५ दिनांक ०८.१०.२००९.
२. शासन आदेश क्रमांक: संकीर्ण-२०१४/(२०३/१४)/मशि-४, दिनांक २७.०१.२०१५
३. शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२२१५/प्र.क्र.३०/आस्था-१ दिनांक ३०.०१.२०१५.
४. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१५/(प्र.क्र.२९१/१५)/मशि-१ दिनांक ०१.७.२०१५.

परिपत्रक

उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक ११६१३/२०१४ व २५२७/२०१७ मध्ये निर्णय देताना न्यायालयीन प्रकरणे हाताळणीबाबत तसेच सर्वसाधारण कार्यालयीन कार्यपद्धतीबाबत कठोर निरीक्षणे मा.न्यायालयाने नोंदवून याबाबत ठोस उपाययोजना तात्काळ करण्याचे निर्देश दिलेले आहेत. न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासंदर्भात शासनाने यापूर्वी संदर्भाधीन परिपत्रकान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचना पुन:श्च या परिपत्रकाद्वारे निदर्शनास आणण्यात येत असून, न्यायालयीन प्रकरणे उद्भवू नयेत याकरिता खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे आणि यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास संबंधीत अधिकाऱ्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाईची प्रक्रीया सुरू करण्यात येईल. सदरची बाब संचालक (उच्च शिक्षण) यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी:-

१. क्षेत्रीय कार्यालयामध्ये अर्जदाराने त्याच्या मागणी/तक्रारीबाबत केलेल्या अर्जावर कार्यवाही न झाल्यामुळे अर्जदार न्यायालयामध्ये याचिकेद्वारे दाद मागत असल्याने क्षेत्रिय कार्यलयात प्राप्त होणारी मागणी/तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रचलित नियमातील विहीत तरतूदीं विचारात घेऊन त्यांनी केलेली मागणी योग्य असल्याची खातरजमा करून तात्काळ निकाली काढण्यात यावे व केलेल्या कार्यावाहीबाबत अर्जदारास कारणमिमांसेसह उत्तर कळविण्यात यावे.

२. संबंधित कर्मचाऱ्याच्या निवृत्तीच्यावेळी त्याच्या नियुक्तीसंदर्भात प्रश्न उपस्थित होऊ नये याकरिता संबंधित कर्मचाऱ्याच्या नियुक्तीच्या वेळेसच सर्व नियमांचे पालन करुन /आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करुनच नियुक्ती आदेश देण्यात यावेत. विशेषत: वर्ग-४ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना न्यायालयात दाद मागण्याची वेळ येऊ नये, याकरिता त्यांची प्रकरणे तात्काळ व गांभिर्यपूर्वक हाताळण्यात यावीत. त्यांच्या सेवाविषयक तसेच निवृत्तीवेतन विषयक बाबीसंदर्भात काही त्यांचा प्रश्न उद्भवल्यास संस्था/महाविद्यालये तसेच संबंधित क्षेत्रीय कार्यालये यांची संयुक्त बैठक/सुनावणी घेऊन प्रश्न मार्गी लावावा. तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत उपस्थित मुद्यांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात यावा व प्रचलित नियमातील विहीत तरतूदी विचारात घेऊन प्रकरणांचा निपटारा लावण्याच्यादृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

३. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती/मान्यतेसंदर्भात त्यांच्या सेवा कालावधीमध्ये प्रश्न उपस्थित होऊ नयेत, याकरिता त्यांच्या नियुक्तीच्यावेळी शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या अधिकाऱ्याने नियुक्ती/मान्यतेसंदर्भातील सर्व बाबींची पूर्तता होत असल्याची खातरजमा करावी व काही त्रुटी/आक्षेप असल्यास नियुक्तीपूर्वीच निदर्शनास आणाव्यात. संबंधित शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्या नियुक्तीनंतर अशा त्रुटी उपस्थित झाल्यास संबंधित शासन प्रतिनिधीवर जबाबदारी निश्चित केली जाईल.यासंदर्भात संबंधीत लेखाधिकारी यांनी काही त्रुटी उपस्थित केली असेल आणि विभागीय सहसंचालक यांनी उपस्थित त्रुटींची पूर्तता न करता परस्पर व हेतुपरस्सर प्रचलित नियमास बगल देऊन कार्यवाही केल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधीत विभागीय सहसंचालक शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरेल.

४. अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये एखादा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अनुदानित पदावर असताना काही तांत्रिक अडचणीमुळे अतिरिक्त ठरला असेल तर अतिरिक्त अनुदानित व्यक्तीच्या समावेशनाबाबत शासनाच्या क्र.युएसजी-१२९३/(२६४७)/विशि-४, दिनांक २७ मे, १९९७ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०५ मध्ये विहीत केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. यासंदर्भात समायोजनाची कार्यवाही तात्काळ करून एकही शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरणार नाही/ठरलेला नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधीत विभागीय सहसंचालक यांची राहील. समायोजित केलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचा अहवाल आवश्यक त्या कागदपत्राच्या पूर्ततेसह शासनाच्या उक्त दि. २७.५.१९९७ अन्वये शासनास सादर करण्यात यावा.

५. **शासकीय विधीविषयक कामकाज हाताळण्याचे नियम, १९८४ मधील नियम ५८ अन्वये** शासनाच्यावतीने शासनाची बाजू मांडण्यास्तव प्राधिकृत करण्यात आले आलेल्या प्राधिकाऱ्याने प्रकरणाचा गांभीर्याने अभ्यास करून शासनाच्या ध्येयधोरणाशी निगडीत असलेल्या सर्व अधिनियम/अधिसूचना/शासन निर्णय/परिपत्रक/आदेश या अनुषंगाने संबंधीत सरकारी वकील यांना व्यक्तिशः उपस्थित राहून सूचना द्याव्यात व शासनातर्फे सादर करण्यात येणारे शपथपत्र विहीत मुदतीत दाखल करण्याची कार्यवाही संबंधीत प्राधिकाऱ्याची राहील. यासंदर्भात कोणतीही अनियमतता आढळून आल्यास प्राधिकाऱ्याविरूध्द तात्काळ शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. तसेच प्रत्येक परिणामकारक सुनावणी दिवशी संबंधीत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी मा. न्यायालयात व्यक्तिशः उपस्थित राहून सरकारी वकील यांना सहकार्य करण्याची जबाबदारी संबंधीत प्राधिकाऱ्याची राहील. सदर सुनावणीदरम्यान योग्य बाजू मांडण्यास्तव एखादा महत्वाचा मुद्दा उद्भवल्यास/निदर्शनास आल्यास त्याबाबतची सूचना तात्काळ संचालक (उच्च शिक्षण) व शासनाकडे त्याचदिवशी देण्यात/अवगत करण्यात यावी. ज्या अधिकाऱ्यांना शासनाच्यावतीने मा. न्यायालयात उपस्थित राहून मा. न्यायालयाच्या आदेश/निर्देशाबाबत अवगत करण्याबाबत प्राधिकृत करण्यात आलेले आहे, त्या जबाबदार अधिकारी यांनी शासनाच्यावतीने कोणतेही भाष्य करताना शासनाच्या ध्येयधोरणाशी निगडीतच तसेच प्रतिज्ञापत्राशी सुसंगत भूमिका मांडावी.

६. संबंधीत न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या ध्येयधोरणाविरूद्ध विसंगत भूमिका मांडल्यास, सरकारी वकीलांना माहिती उपलब्ध करून न दिल्यास, चुकीची माहिती दिल्यास, हेतु परस्सर माहिती लपविली असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत प्राधिकाऱ्यावर ठेऊन तो शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरेल. अशा प्रकरणी शासनावर अनावश्यक आर्थिक भार पडत असल्यास/पडणार असल्यास सदरची वसुली देखील संबंधीत प्राधिकारी यांचेकडून करण्यात येईल.

७. शासनाच्या ध्येयधोरणाशी निगडित याचिका दाखल झाल्यास, सदरची बाब संबंधीत प्राधिकाऱ्याने संचालक (उच्च शिक्षण) व संबंधीत विभागीय सहसंचाल (उच्च शिक्षण) यांच्या निदर्शनास आणावी. यासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण यांनी स्वतः मा. न्यायालयात उपस्थित राहून शासनाची भूमिका मांडणे बंधनकारक राहील.

मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र .११६१३/२०१४ श्री.सचिन करवले व इतर आणि याचिका क्रमांक २५२७/२०१७ श्री. स्वप्नील तळेकर व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर यामध्ये दिनांक २६.११.२०१८ व दिनांक ०५.१२.२०१८ रोजीच्या आदेशाच्या प्रती त्यांच्या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घेण्यात याव्यात आणि त्याचे अवलोकन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(वि.व. दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुंख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
६. सर्व मा.विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई
१३.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१५.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६.मा. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे.
१७.सर्व विभागीय सहसंचलाक, उच्च शिक्षण.
१८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१९.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई, महाराष्ट्र/मुंबई १/२.
२०.लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
२१.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२२.सर्व जिल्हा कोषाधिकारी यांची कार्यालये.
२३.मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२४.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५.म.शि.५ कार्यासन, निवडनस्ती.